संं.फौ.खटला क्र. ३७३/२०२४.
नि. क्र.६ खाली.

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव –** भिकाजी शिवाप्पा पाटील.

**वय** - ६० वर्ष, **व्यवसाय** - शेती,

**राहणार.-** नेसरी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

**सरकारतर्फे सरतपास– श्रीमती. एस. ए. म्हामूलकर, सरकारी वकील.**

१. मला रा.ऊ.शु. पोलिसांनी बहिरेवाडीला बोलाविले होते. पोलिसांना आरोपी दारु विकत असल्याची खबर असल्यामुळे आम्ही ओढयाकडे गेलो होतो, त्यावेळी आमच्या सोबत दोन शिपाई, एक साहेब व आम्ही दोन पंच गेलो होतो. आम्हाला ओढयाजवळ एक भट्टी मिळाली होती. तेथे असलेल्या दोन पत्र्याच्या बॅरेलमध्ये आम्हाला दारुचे रसायन मिळाले होते. पोलिसांनी त्याबाबतचा आमच्या समक्ष पंचनामा केला होता. तो माल आरोपीच्या ताब्यातून जप्त केला होता. आता मला तो पंचनामा दाखवला, त्यावरती माझी स्वाक्षरी असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **नि. क्र. पी. – ७** देण्यात येतो. आरोपी आज न्यायालयात हजर आहे. मला जप्त मुद्देमाल दाखवल्यास ओळखता येऊ शकतो.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपीतर्फे उलटतपास – श्री. डी. जे. देसाई वकील.**

२. आम्ही पंचनाम्यासाठी गेलेल्या ओढयाच्या आसपासच्या जमिनीचे गट क्रमांक मला सांगता येणार नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे बहिरेवाडी गावातील ओढयाकडे कधीही गेलेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला तेथे १६० व १७० लिटर दारु रसायनाने भरलेले बॅरल मिळाल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी गडहिंग्लज येथील कार्यालयात पंचनाम्यावरती स्वाक्ष–या केलेल्या असून आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – २०.०२.२०२५.

(आर. पी. थोरे)

आजरा.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.